# स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई
## अधिष्ठाता यांचे कार्यालय

जा.क्र./शावैमरुअं/सा.भांडार/ 1543/२०२१ दिनांक 19/ 3 /२०२१

विषय:- रक्तपेढी केंद्रातील यंत्रसामुग्रीचे Calibration करणे बाबतचे दरपत्रके सादर करणे बाबत..

संदर्भ : - प्रभारी अधिकारी, शासकिय रक्तपेढी, शरिरविकृतीशास्त्र विभाग यांचे दिनांक ११/१/२०२१ रोजीचे पत्र

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, या रुग्णालयातील रक्तपेढी केंद्रातील यत्रसामुग्रीचे Calibration चा कालावधी २१फेब्रुवारी २०२० रोजी संपुष्ठात आलेला असल्याने पुढील एक वर्षाच्या कालावधीसाठी या सोबत जोडण्यात आलेल्या यादीतील यंत्रसामुग्रीचे Calibration करावयाचे असल्याने सोबत जोडण्यात आलेल्या यादीतील यंत्रसामुग्रीच्या Calibration चे दरपत्रक सादर करण्यात यावेत.

तसेच सदर सुचनेनुसार मोहरबंद दरपत्रके मा.अधिष्ठाता ,स्वमी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय अंबाजोगाई यांच्या नावे सादर करण्यात यावीत. तसेच सदरील साहित्यांच्या Calibration चे दरपत्रक सादर करण्यासाठी अतिम दिनांक1 /४/२०२१ रोजी दुपारी ५.०० वाजेपर्यत असुन प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक ३/४ /२०२१ रोजी प्रशासकीय कार्यालयात खरेदी समिती समक्ष उघडण्यात येतील.

**अटी व शर्ती**

१. CALIBRATION करणारी एजन्सी ही NABL A क्रिडेटेड असावी व त्याची ट्रेसीबीलीटी असणे बंधनकारक आहे
२. रक्तपेढी केंद्रातील ज्या यंत्रससामुग्रीचे CALIBRATION करावयाचे आहे व ज्या साहित्याच्या सहाय्याने सदर CALIBRATION करावयाचे आहे ते साहित्य CALIBRATED असणे बंधनकारक आहे.
३. CALIBRATION करणारा व्यक्ती Qualified असावा. त्या बाबतचा पुरावा सादर करणे बंधनकारक राहील.
४. CALIBRATION करणारी एजन्सी ही प्रचलित नियमानुसार नोंदणीकृत असावी व त्या बाबतचा पुरावा सादर करणे बंधनकारक राहील.
५. दरपत्रक धारकाने मुबंई दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ नुसार दुकानाचे शासन मान्य नोंदणी प्रमाणपत्र छांयाकीत प्रत दरपत्रकासोबत जोडणे बंधनकारक आहे.
६. दरपत्रक धारकाकडे सुक्षम,लघु व मध्यम उद्योगक मंत्रालय भारत सरकार यांच्याकडे नोंदणी केलेले उद्योग आधार प्रमाणपत्र असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

24/3/21
Dr. Orhal R.S.
(Microbiology)

७. दरपत्र धारकाच्या दुकानाचे नाव,संपुर्ण पत्ता,नोंदणी क्रमांक,जीएसटीनंबर व पॅन नंबर असलेल्या दुकानाच्या लेटर पॅडवर सही व शिक्का असलेली दरपत्रके सदर साहित्याच्या अ.क्रमांक यादीनुसार सादर करण्यात यावी,तसेच ज्या साहित्यांचे दर उपलब्ध होऊ शकत नाहित त्या साहित्याच्या दराच्या ठिकाणी एन. ए. ( NA ) नमुद करावे.

दरपत्रका सोबत शासन मान्य जीएसटी प्रमाणपत्र,फर्मच्या नावाचे किवा प्रोप्रायटरच्या नावचे पॅन कार्डची छांयाकीत प्रत तसेच एकल दरपत्रक धारक असल्याचे स्वत: स्वाक्षरीचे प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे.सदर प्रमाणपत्र नमुना देण्यात आलेला आहे.

८. दरपत्रकातील साहित्यांचे दर शासन नियमानुसार सर्व करांसहीत बाजार भावापेक्षा जास्त दराचे सादर करण्यात येऊ नये.तसेच सर्व साहित्य स्वत: स्वखर्चाने दहा दिवसांच्या आत पुरवठा करणे बंधनकारक राहिल.तसेच वाहतुक खर्च किवा इतर कोणताही जादा खर्च देण्यात येणार नाही.

९. मागविण्यात आलेल्या साहित्यांचे दरपत्रक प्रमाणित झाल्याच्या दिनांकापासुन सहा ( ०६ ) महिन्यापर्यत वैध राहतील.

१०. प्रशासकीय कारणास्तव देयके अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब शुल्क किंवा व्याज देण्यात येणार नाही.

११. पुरवठा करण्यात येणारे साहित्य वैध कालावधीचे व चांगल्या प्रतीचे असावे. हलके किंवा निकृष्ट दर्जाचे असल्यास पुरवठा आदेश रद्य करण्यात येतील व त्याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील.

१२. तसेच अपुर्ण माहितीसह व प्रमाणपत्रा शिवाय साद केलेली संबंधीतांची दरपत्रके विना स्पष्टीरण नाकारण्यात येतील तसेच प्रशासकिय कारणास्तव किंवा निधी अभावी काही अडचण निर्माण झाल्यास साहित्य खरेदी बाबत सदरच्या दरपत्रकाची संपुर्ण प्रक्रिया रद्य करण्याचा अधिकारी अधिष्ठाता यांना राहिल.

१३. उपरोक्त प्रमाणे अटी व शर्ती मान्य असल्यासच सदरचे दरपत्रके सादर करावे.

अधिष्ठाता,
स्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण शासकिय
वैद्यकिय महाविद्यालय रुगणालय,अंबाजोगाई

सोबत :- CALIBRATION करावयाच्या यंत्र सामुग्रीची यादी.

प्रत : -

१. संस्थेची वेबसाईट,स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.म.व रुग्णालय,अंबाजोगाई.
२. नोटीस बोर्ड,महाविद्यालय विभाग, स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.म.व रुग्णालय,अंबाजोगाई.

रक्तपेढी विभागातील साहित्याचे Calibration करावयाच्या यंत्रसामुग्रीची यादी खालील प्रमाणे

| Sr. No. | Name of Equipments | Quantity |
|---|---|---|
| 1 | Refrigerated Centrifuge with Stabilizer | 1 |
| 2 | Deep – Freeze (-40 / 80 Deg) | 1 |
| 3 | Blood Storage Cabinet 2-6 Deg C stabilizer | 1 |
| 4 | Platelet agitator with incubator | 1 |
| 5 | Weighing Machine | 1 |
| 6 | Fefrigeratior, Range : 2 – 8 Deg C | 1 |
| 7 | Centrifuge | 1 |
| 8 | Incubator | 1 |
| 9 | Pipette 1000µl | 1 |
| 10 | Pipette 20-200µl | 1 |
| 11 | Pipette 5-50µl | 1 |
| 12 | Pipette 5-50µl Multi | 1 |
| 13 | PH Meter | 1 |
| 14 | Laminar air flow | 1 |
| 15 | Blood bag Weighing Machine | 1 |
| 16 | Donor Weight machine | 1 |
| 17 | Plasma Thawing Bath | 1 |
| 18 | Constant Temperature Bath | 1 |
| 19 | Blood bag Tube sealer | 1 |
| 20 | Microscope | 1 |
| 21 | Eliza Reader | 1 |
| 22 | Eliza Washer | 1 |
| 23 | Table Top Micro centrifuge with PCR Plate Rotor | 1 |
| 24 | Table Top Laboratory Centrifuge (REMI) | 1 |
| 25 | Vortex Mixture with Digital Display | 1 |

| | | |
|---|---|---|
| 26 | Eppendorf Rotor Tube | 1 |
| 27 | Laboratory Refrigerator (- 20 o C) | 1 |
| 28 | Deep Freezer (- 20 o C)<br><br>(Along with Voltage Stabilizer) | 1 |
| 29 | Pipette single Channel - 1000µl (Thermoscientific) | 1 |
| 30 | Pipette single Channel - 200µl (Thermoscientific) | 1 |

अधिष्ठाता,
स्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण शासकिय
वैद्यकिय महाविद्यालय रुगणालय,अंबाजोगाई

दरपत्रक धारक अधिकृत विक्रेता/पुरवठादार/कंपनी यांचे लेटरहेड

Letter No. Date :

प्रति,
मा.अधिष्ठाता,
स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय व रुग्णालय,अंबाजोगाई

विषय :- यंत्राचा वार्षिक देखभाल दुरुस्ती सेवा करार ( AMC ) सर्वसमावेशक देखभाल दुरुस्ती सेवा करार ( CMC ) विषय हमीपत्र ( अट क्रं.१३ आणि १४ नुसार )
संदर्भ :- आपले दरपत्रक मागणी पत्र
क्रमांक.
दिनांक.

महोदय,

संदर्भाकीत दरपत्रक मागणीपत्रकानुसार मागणी करण्यात आलेले यंत्राचा वार्षिक देखभाल करार (AMC) सर्वसमावेशक देखभाल दुरुस्ती सेवा करार ( CMC ) करणे विषयी सादर करण्यासंबंधीचे हमीपत्र मी खालीलप्रमाणे देत आहे.

## हमीपत्र ( Undertaking )

यादवारे, हमी देतो की, सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात आमच्यादवारे पुरवठा करण्यात आलेल्या यंत्रसामग्रीच्या देखभाल दुरुस्तीस ( यंत्राच्या हमी कालावधीसह पुढील ८ वर्षे ) आम्ही बांधील आहोत.

यंत्राच्या हमी ( WARRANTY ) कालावधीत कोणतीही तांत्रिक समस्या निर्माण झाल्यास अथवा यंत्रे संपुर्णपणे बंद पडल्यास २४ तासात यंत्राच्या समस्येचे निराकरण करुन देण्यात येईल अथवा नवीन यंत्राचा पुरवठा करण्यात येईल यासाठी कोणतेही अतिरीक्त शुल्क आकारण्यात येणार नाही. तशी मागणी करण्यात येणार नाही.यंत्राचा २ वर्षाचा हमी कालावधीनंतर ( WARRANTY PERIOD ) पुढील ८ वर्षे प्रतिवर्षी संस्थेच्या आवश्यकतेनुसार यंत्राच्या खरेदी किमतीच्या १% प्रमाणे वार्षिक देखभाल दुरस्ती सेवा करार ( AMC ) अथवा ५% प्रमाणे सर्वसमावेशक देखभाल दुरुस्ती सेव करार ( CMC) करणे आम्हास बंधनकारक राहील.त्यासाठी अटी व शर्ती करारपत्रे वेळोवेळी कार्यालयास सादर करण्यात येणार आहे.

खरेदी करार ( PURCHASE AGREEMENT ) वार्षिक सर्वसमावेशक देखभाल दुरुस्ती करार ( AMC & CMC AGREEMENT ) यांचा भंग झाल्यास नियमानुसार होणाऱ्या कार्यवाहीस मी/आम्ही पात्र असु तदसंबंधी माझी/आमची कुठलीही हरकत राहणार नाही.अशी यादवारे मी हमी देत आहे.

अधिकृत व्यक्तीचे नाव व स्वाक्षरी,
शिक्का आणि मोहर
Authorized Person Name,
Signature
With Stamp and Seal

दरपत्रक धारक अधिकृत विक्रेता/पुरवठादार/कंपनी यांचे लेटरहेड

Lettr No. Date :

प्रति,
मा.अधिष्ठाता,
स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय व रुग्णालय,अंबाजोगाई

विषय : - एकल दरपत्रक सादर करणेसंबंधीचे हमीपत्र सादर करणेबाबत
( अट क्रं.(१०) मधील दस्ताऐवज क्रं.०७ प्रमाणे )
संदर्भ : - आपले दरपत्रक मागणी पत्र
क्रमांक.
दिनांक.

महोदय,

संदर्भाकीत दरपत्रक मागणी पत्रानुसार मागणी करण्यात आलेले एकल दरपत्रक सादर करण्यासंबंधीचे हमीपत्र मी खालील प्रमाणे सादर करीत आहे.

## हमीपत्र ( Undertaking )

यादवारे हमी देतो की, दरपत्रक प्रक्रीयेसाठी एकच दरपत्रक सादर करीत आहे. आमच्याच फर्मशी निगडीत असलेल्या कुठल्याही व्यक्तीच्या नावे किंवा अप्रत्यक्षपणे केवळ आम्हास लाभ होईल, अश्या प्रकारे दुसरे दरपत्रक दरपत्रकप्रक्रीयेमध्ये सादर केलेला नाही. तसेच माझा/आमचा आपल्या कार्यालयातील खरेदी प्रक्रीयेतील खरेदी प्राधिकाऱ्याशी कुठलेही हितसंबंध नाही.

उक्त बाब भविष्यात असत्य/खोटी आढळुन आल्यास,र्स्वस्वी जबाबदारी आमची राहील.नियमानुसार होणाऱ्या कार्यवाहीस मी /आम्ही पात्र असु. तदसंबंधी माझी/आमची कुठलीही हरकत राहणार नाही. अशी यादवारे मी हमी देत आहे.

अधिकृत व्यक्तीचे नाव व स्वाक्षरी,
शिक्का आणि मोहर
Authorized Person Name,
Signature
With Stamp and Seal